**अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र. ०६ यांची साक्ष.**

**मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,**

**नाव** - सतीश देविदास गडलिंगे

**वय** - ४६ वर्ष, **पद** - वनपरिक्षेत्र अधिकारी

**नेमणूक** - नांदेड सामाजिक वनिकरण विभाग, जि. नांदेड.

**सरतपास सरकारतर्फे सहा. सरकारी अभियोक्ता श्रीमती. एच.ए. डेकाटे यांच्यामार्फत.**

दि. १४.०३.२०२५ रोजी पोलिस पाटील भिमटे, सिरोंजी यांनी वनपरिक्षेत्र अधिकारी आठवले यांना फोनद्वारे माहिती दिली की भानगडा नाल्यामध्ये एक वाघ मृत अवस्थेत पडून आहे. मी माझ्या स्टाफसह तिथे दुपारी २.३० वाजता तिथे पोहचलो. सिरोंजीच्या मेन रोड पासून अंदाजे ३५० ते ४०० मिटर अंतरावर नाल्यामध्ये मध्यभागी एक वाघ मृत अवस्थेत दिसला. त्याचे वय अंदाजे साडे तीन वर्ष होते. वाघ नाकापासून ते शेपटी पर्यंत २९० से.मी. लांब होता. शेपटीची लांबी ९२ से.मी., समोरील पायाची लांबी ८८ से.मी., मागील पायाची लांबी ९७ से.मी., दोन्ही पायातील अंतर ८४ से.मी., मानेचा घेर ८० से.मी, छाती पाटाचा घेर ११८ से.मी., कानाची लांबी ९ से.मी., दोन कानामधील अंतर १८ से.मी., पुढील पायातील अंतर २५ से.मी. व मागील पायातील अंतर २९ से.मी. होती. सदर वाघाचा पुर्वेस दिड मिटरच्या अंतरावर एक तार जळलेल्या अवस्थेत होती. मी मला दाखवल्यास मी ओळखू शकतो. मला सेंट्रींग तार दाखवण्यात आली. ती तीच आहे. त्यास **एम.ओ. क्र. १४** देण्यात येते.

**२.** वाघाच्या पश्चिम दिशेला ९६ से.मी. बोरीच्या झाडाचे लाकूड होते. त्याला रक्त लागलेले होते. ते मला दाखवण्यात आले. ते तेच आहे. ते एम.ओ.क्र.१ वर आहे. वाघाच्या उत्तर दिशेला २५० मिटरवर एक शेकोटी दिसली. वाघापासून ते शेकोटी पर्यंत ८ काडया रोवलेल्या होत्या. वाघाच्या दक्षिण दिशेस सेंट्रींग तार गुंडाळा करून होता. ती मला

दाखवण्यात आली. ती एम.ओ.क्र. ३ वर आहे. वाघाचे मोक्का स्थळावर शवविच्छेदन झाले. डॉक्टरांनी सॅम्पल काढले. तिथे लाकडाची व्यवस्था करून वाघाचे दहन करण्यात आले. पहिला पंचनामा दुपारी २.३० ते सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत केला. दुसरा पंचनामा शवविच्छेदनाचा पंचनामा सायंकाळी ५.१५ ते ६.३० मध्ये करण्यात आला. पंचांची नावे अमोर धुर्वे व अंकुश परतेकी अशी होती. मला नि.क्र. ४० वरील मोक्का पंचनामा दाखविण्यात आला. त्यावर माझी व पंचांची सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. मी कच्चा हात नकाशा काढला होता. तो मला दाखवण्यात आला. तो तोच आहे. त्यावर माझी व पंचांची सही आहे. त्यास **निशाणी क्र. ६८** देण्यात येते. घटनास्थळाच्या पूर्वेस गजानन घाटे यांची खाजगी शेती आहे, पश्चिमेस बाबाराव ढोकणे यांची खाजगी शेती आहे, उत्तर व दक्षिणेस भाणगळा नाला आहे.

**३.** दि.१४.०३.२०२५ रोजी घटनास्थळावर मिळालेल्या लाकडाचा (एम.ओ.क्र.१), सेंट्रींग तार, ५० लाकडी बांबूच्या खुटया, जप्त करून जप्ती पंचनामा केला. जप्ती पंचनामा मला दाखवण्यात आला. तो तोच आहे. त्यावर माझी व पंचांची सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **निशाणी क्र. ६९** देण्यात येते. सदर मुद्देमाल वन रक्षक शेलार यांना सुर्पतनाम्यावर देण्यात आला. तो मला दाखवण्यात आला. तो नि.क्र. ६३ वर आहे. शवविच्छेदन व दहन पंचनामा मला दाखवण्यात आला. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. तो नि. क्र. १५ वर आहे.

**४.** दि.१५.०३.२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजताच्या सुमारास मिळालेल्या माहिती नुसार मानिक सेलू, राजू दरसमा व संजय सिलू यांच्या सर्च करिता आम्ही तोरणी गावात निघालो. सुरूवातीला छिंदवाडा येथील सौंसर पोलिस स्टेशनला गेलो. त्यांनी सांगितले की सदर पोलिस स्टेशन बिछवा हद्दीमध्ये येते. तिथून आम्ही बिछवा पोलिस स्टेशनमध्ये गेलो. तिथे त्यांनी सांगितले की खमारपाणी पोलिस चौकी येथे जा, तिथे पी.एस.आय. डोंगरा यांच्याशी चर्चा केली त्यांनी सांगितले की होळी असल्याने तिथील लोक

नशेत राहतील त्यामुळे त्यांनी आम्हाला दि. १६.०३.२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता येण्यास सांगितले. आम्ही वापस खापा येथे आलो. दि. १६.०३.२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता खमारपाणी पोलिस चौकीत पोहचलो. बिछवा पोलिस ठाणे येथील ठाणेदार मरस्कोल्हे यांना फोन लावला. ते तिथे आले. त्यांच्या सोबत आम्ही खमारपाणीला गेलो. खमारपाणी येथे माणिक सिलूच्या घरी गेलो व त्याला ताब्यात घेतले. काही अंतरावर राजेश सेलूचे घर होते. तो तिथे सापडला नाही. शेतात काम करत असतांना त्याला पकडून ताब्यात घेतले व खापा येथे आलो. नि.क्र. १८ व १९ वरील मोक्का पंचनामा मला दाखवण्यात आला. त्यावर माझी व पंचांची सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे.

**५.** दि. १९.०३.२०२५ रोजी पंढरी कुंभरे, नंदू भलावी, किशोर भलावी यांचा मेमोरेंडम पंचनामा नोंदवण्यात आला. पंढरी कुंभरे याचा सकाळी १०.०० वाजता कबुली जबाब नोंदवण्यात आला. त्याने कबुल केले की, दि. १३.०३.२०२५ रोजी एका शेतात इलेक्ट्रीक करंट टाकून एका वन्य प्राण्याची शिकार केली. त्या घटनेतील साहित्य व घटनास्थळ तो दाखवण्यात तयार आहे. त्यानंतर वन अधिकारी, पंच व आरोपी पंढरी कुंभरे तसेच श्वान पथक सहित सोनपूर गाव येताच आरोपीने डाव्या बाजूला गाडी थांबवण्यास सांगितले. सर्वे क्र. १०६ गजानन श्रीरामे पाटील यांच्या शेतात नेले. शेताच्या दक्षिणेस एक पडक्या स्वरूपाची झोपडी होती. त्या झोपडीमध्ये एक जर्मन घमिले व प्लास्टीक गोणी त्यांनी दाखवली. त्याने सांगितले की, वन्य प्राण्याचे मास कापण्याकरिता गोणी वापरतो व त्याचे छोटे तुकडे करून घमिल्यामध्ये टाकतो. तेथून उत्तरेस ५० मिटरच्या अंतरावर एका झाडाच्या फांदिवर त्याने दोन सेंट्रींगचे तार गुंडाळलेले दाखवले. त्याच्याच बाजूला १० फुट अंतरावर, ज्या तारेने आकोडा टाकत होता ते तार व १५ लाकडी साग खुंटया दाखवल्या. मला खुंटया दाखवण्यात आल्या. त्या एम.ओ.क्र. २ वर आहे. तारेचे बंडल एम.ओ.क्र.३ वर आहे. घमिले एम.ओ.क्र. ७ वर आहे. त्याने पुन्हा झोपडीजवळ आणले. झोपडीच्या वर २ सेंट्रींगच्या तारेचा गुंडाळा दाखवला. पंढरीला भाणगडा येथे घेवून गेलो. परंतु त्याने

सांगण्यास नकार दिला. तेथून त्याने सुचवल्याप्रमाणे सोनपूर गावात त्याचे घर आहे. ते घटनास्थळापासून अडीच किलो मिटरच्या अंतरावर आहे. त्याच्या घरी त्याची पत्नी होती. घराच्या अंगणात पंढरीने एक कु-हाड, दांडयाची लांबी ५५ से.मी., पाता रुंदी १३ से.मी. आहे. तो एम.ओ.क्र. ५ वर आहे. एक सत्तूर १७ से.मी. लांबी व ४ से.मी. पात्याची रुंदी व एक कु-हाडीचा दांडा ४७ से.मी. (एम.ओ.क्र. १० व ११) चा आहे. ते त्याने दाखवले. ते जप्त केले व जप्ती पंचनामा केला. तो मला दाखवण्यात आला. तो नि.क्र.२४ वर आहे.

**६.** दि. २१.०३.२०२५ रोजी पंढरीचे बयाण नोंदवले. मी ते टाईप केले. पंढरीने सांगितले की, पंढरी रोज रात्री शेतामध्ये विद्युत तारेने वन्य प्राण्याची शिकार करतो व त्याची माहिति किशोर भलावी, नंदू भलावी व उत्तम मेश्राम या तीन साथीदारांना देतो. उत्तर मेश्राम व पंढरी हे वन्य प्राण्याची शिकार झाल्यावर त्याला कापून त्याचे मास तयार करून ठेवतात. किशोर भलावी हा ग्राहक शोधून देतो त्याच्या बदल्यात पंढरी त्याला पेट्रोलचे पैसे व दारू देतो.

**७.** दि. १३.०३.२०२५ रोजी रात्री ८.०० वाजता सुमारास त्याने इलेक्ट्रीक करंट गजानन श्रीरामे पाटील यांच्या शेतात लावले. रात्री १०.०० ते ११.०० च्या दरम्यान लाईन ट्रीप झाल्यावर त्याच्या लक्षात आले की, वन्य प्राण्याची शिकार झाली आहे. तो शेतात थांबला. दुस-या दिवशी सकाळी ९.०० वाजताच्या सुमारास तो सोनपूर येथील नंदू भलावीच्या घरी आला. तेथे नंदू भलावी व उत्तम मेश्राम त्यांना भेटले. उत्तम मेश्राम नंदू भलावीच्या घरी राहत होता. नंदू भलावीच्या मोबाईलवरून किशोर भलावी याला सांगितले की, रानडुक्कराची शिकार झाली आहे. तु सदर शेतात अर्ध्या तासात ये. नंदू भलावी त्याच्या कामावर निघून गेला. किशोर भलावी, उत्तम मेश्राम शेतात आले. त्यांनी रानडुक्कराचे मास तयार करून ठेवले. किशोर भलावी तेथे मोटर सायकल घेवून आला. किशोर भलावी व पंढरी मोटर सायकलवर मास घेवून सर्रा येथे गेले. सर्रा येथे विट भट्टीवर काम करणारे मजूर छेदिराम यांच्या सोबत मटनाचा सौदा रू. २०००/- मध्ये केला. सदर मटन अंदाजे २०

किलो होते. रू. १५०/- त्याला नगदी दिले व बाकीचे पैसे दुस-या दिवशी देतो असे सांगितले. पंढरी व किशोर यांनी दुस-या दिवशी रू. ५००/- छेदिरामकडून घेतले व बाकी पैसे नंतर देईल असे सांगितले. असा बयाण मी टाईप केला होता.

**८.** दि. २१.०३.२०२५ रोजी मुन्ना धुर्वे, रा. टेकाडी व उमेश सिलू, रा. छिंदवाडा असे दोन नावे समोर आली. आम्ही टेकाडी गावात गेलो. मुन्ना धुर्वे त्याच्या शेतात बैल चारत होता. त्याने सांगितले की, त्याचा मोबाईल त्याचा मुलगा वापरतो. त्याचा मुलगा फोनवर बोलत असल्याने दमडाटावर त्याचा नंबर आला. त्याप्रमाणे मोक्का पंचनामा केला. तो मला दाखवण्यात आला. तो नि.क्र.५० वर आहे.

**९.** दि. २२.०३.२०२५ रोजी नंदू भलावी, किशोर भलावी व छेदिराम ठाकूर यांनी कबूली जबाब दिला. त्यानुसार चोरखैरी या गावात आलो. किशोर भलावी याने त्याचे घर दाखवले. त्याच्या घरी काही सापडले नाही. गुन्हयात वापरलेली बाईक त्याच्या आईच्या घराच्या बाजूला ठेवल्याचे त्याने सांगितले. बजाज कंपनीची सी. टी. १०० क्र. एम. एच. ४० बी.एस. ६३३६ काळया रंगाची ही ताब्यात घेतली. तेथून सोनपूर येथील नंदू भलावीच्या घरी आलो. त्याच्या घराच्या वरच्या माळयावर उत्तम मेश्राम राहत होता. तिथे दोन सु-या त्याने दाखवल्या. त्या मला दाखवण्यात आल्या. त्या एम.ओ.क्र.१३ वर आहे. तेथून छेदिराम ठाकूर याने सर्रा विट भट्टी येथे नेले. ज्या ठिकाणी मासची देवाण-घेवाण झाली ते ठिकाण दाखवले. त्याप्रमाणे कबुली जबाब नोंदवला. तो मला दाखवण्यात आला. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. तो नि.क्र. ५३ व २७ वर आहे.

**१०.** दि. २३.०३.२०२५ रोजी माणिक सिलू व राजू दरसमा यांचा कबुली जबाब नोंदवण्यात आला. त्यांना घेवून खमारपाणी पोलिस चौकी, छिंदवाडा व तेथून दुपारी ३.०० वाजता तोरणी गावात पोहचलो. मानिक सिलू याने त्याचे घर दाखवले. त्याच्या घराची झडती घेतली असता तो आकोडा टाकण्यासाठी वापरलेली प्लास्टीक कोटेट वायर त्याने दाखवली. ती मला दाखवण्यात आली. ती नि.क्र.९ वर आहे. राजू दरसमा याने त्याचे घर

दाखवले. तेथे काही आढळले नाही. त्यामुळे आम्ही खापा येथे आलो. त्याप्रमाणे मेमोरेंडम पंचानामा केला. तो नि.क्र. ५४ व २८ वर आहे.

**११.** माणिक सिलू व राजू दरसमा यांचे बयाण मी टाईप केले होते. मी आरोपींना ओळखतो. ते आज विडीओ कॉन्फरंसद्वारा न्यायालयात हजर आहेत.

**न्यायालयाची मध्यांतराची वेळ झाल्याने उलटतपास दुस-या सत्राकरिता तहकूब.**

श्रवणोत्तर स्वीकृत,
समक्ष,

SONPARI MAHENDRA GADE
Digitally signed by SONPARI MAHENDRA GADE
Date: 2026.02.16 16:48:12 +0530

सावनेर,
दिनांक १६.०२.२०२६

(एस. एम. गाडे)
**न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,**
(न्यायालय क्र.०३) सावनेर

**<u>उलटतपास आरोपीतर्फे वकील श्रीमती. जे. एच. शेंडे यांचेमार्फत शपथेवर सुरू.</u>**

**१२.** मी घटनेच्या दिवशी ग्राऊंड ऑफिसर होतो व माझ्याकडे दि. १७.०३.२०२५ पर्यंत नागलवाडी याचा अतिरिक्त चार्ज होता. दि. १४.०३.२०२५ रोजी मी बडेगाव नर्सरीमध्ये होतो. वरिष्ठ अधिकारी यांचे आदेश असल्याने मी कार्यालयातून निघायची ऍन्ट्री केली नाही. दि. १४.०३.२०२५ रोजीचा मोक्का पंचनामा मी स्वत: लिहिला आहे. वाघाचे तोंड उत्तर दिशेला होते. जप्त केलेले लाकूड बोरीचे असून पळसचे नाही. पळसचे लाकूड जप्त केलेले नाही. मोक्का पंचनामा मी घटनास्थळावर जावून लिहिला. मोक्का पंचनाम्यावर हजर असलेल्या सर्व अधिका-यांची सही घेतलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी मोक्का पंचनामा लिहिला नाही. घटनास्थळावर सिल नेले नव्हते त्यामुळे मोक्का पंचनाम्यावर सिल नाही. हे म्हणणे खरे आहे की, जप्त केलेल्या बोरीच्या लाकडावर निशाणी टाकली नाही. हे म्हणणे खरे आहे की, सेंट्रींग तारवर निशाणी टाकली नाही. हे म्हणणे खरे

आहे की, बांबूच्या कमच्यावर निशाणी टाकलेली नाही. हे म्हणणे खरे आहे की, निशाणी क्र. ६८ वरील कच्चा नकाशावर कोणत्या दिशेला कोणाची शेती आहे हे नमूद नाही. हे म्हणणे खरे आहे की, मुख्य रस्त्यापासून घटनास्थळाचे अंतर तसेच शेकोटीचे घटनास्थळापासून अंतर नमूद नाही. हे म्हणणे खरे आहे की, नि.क्र. ६९ वरील मुद्देमालावर निशाणी लावल्या नाहीत. मी घटनास्थळाचे जी.पी.एस. रिडींग सांगू शकतो. नि.क्र.६९ वरील कॉलम क्र. ५ प्रमाणे जी.पी.एस. रिडींग २१ डिग्री ३३ मिनिट २५ सेकंद, ७८ डिग्री ५८मिनिट १४ सेकंद असे आहे. हे म्हणणे खरे आहे की, नि.क्र. ६९ वरील जप्ती पंचनामा किती वाजता सुरू केला व किती वाजता संपला हे नमूद केले नाही. हे म्हणणे खरे आहे की, जप्त लाकूड, सेंट्रींग तार व खुंटया या घटनास्थळावरून जप्त केल्या व कोणत्या व्यक्तीकडून जप्त केल्या नाही. हे म्हणणे खरे आहे की, नि.क्र.१४ व नि.क्र. ६९ वरील लाकडाचे लांबी ६९ से.मी. आहे. या केसमध्ये पळस लाकूड अस्थित्वात नाही. डॉ. राजेश कुलसुंगे व मयूर पावसे यांनी शवविच्छेदन केलेले आहेत. हे म्हणणे खरे आहे की, शवविच्छेदन पंचनाम्यामध्ये वाघाचे दात, मिशा व पंजे काढलेले नमूद नाही.

**केसची तयारी करण्याकरिता आरोपीतर्फे वकीलांच्या तोंडी विनंतीवरून उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकूब.**

श्रवणोत्तर स्वीकृत,
समक्ष,

SONPARI MAHENDRA GADE
Digitally signed by SONPARI MAHENDRA GADE
Date: 2026.02.16 16:48:18 +0530

सावनेर,
दिनांक १६.०२.२०२६

(एस. एम. गाडे)
**न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,**
(न्यायालय क्र.०३) सावनेर

## C E R T I F I C A T E

I affirm that the contents of this PDF evidence are same word to word, as per the original evidence.

Name of Stenographer :- D. R. Aglawe